**सीएनआर क्रमांक –एमएचएसक्र.४०००५४०–२०१२**
**नियमित दिवाणी अपील नं.१०७/२०१२**
**नि.१०८ वरील आदेश**.

अपेलंट यांनी नि.३१ वर सर्व्हे ३८५/१० व गट नं.९५३ यांची मोजणी उपअधिक्षक, भुमि अभिलेख इस्लामपूर यांचेमार्फत होवून मिळणेसाठी अर्ज दिला होता. परंतु नि.५ चे अर्जावरील आदेशानुसार दिनांक ०३/०३/२०१६ रोजी तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख यांचेमार्फत करण्याचा आदेश देण्यात आला. त्याप्रमाणे प्रकरण मोजणीसाठी गेले असता, उपअधिक्षक भुमि अभिलेख यांनी नि.१०६ नुसार निमताना मोजणी होणे आवश्यक असल्याचे कथन केले असल्याने अपेलंट यांनी निमताना मोजणी होवून मिळावी म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

रिस्पॉंडंट यांनी नि.१०९ वर म्हणणे दाखल करुन अपेलंट यांच्या अर्जातील कथने नाकबुल केली आहेत. यापुर्वी झालेली मोजणी रद्द झालेशिवाय नविन मोजणी कायदयाने मागता येणार नसल्याने रिस्पॉंडंट यांनी सदरचा अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

प्रस्तुत अर्ज, रिस्पॉंडंट यांचे म्हणणे, नि.५ व नि.३१ वरील आदेश यांचे अवलोकण केले. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. तसेच नि.१०६ वरील उप-अधिक्षक भुमि अभिलेख वाळवा यांनी या पुर्वी दिनांक २९/०३/२००४ रोजी मोजणी झाली असल्याने निमताना मोजणी होणे आवश्यक असल्याचा अहवाल पाहिला. प्रस्तुत प्रकरणी या पुर्वी चौथे सह-दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इस्लामपूर यांनी रे.दि.मु.नं. ०९/१९९८ या मधील न्यायनिर्णयामध्ये नि.११२ वर दाखल केलेला नकाशा विचारार्थ घेवून दावा मंजुर केल्याचे स्पष्ट होते. सदर आदेशाविरुध्द अपेलंट यांनी प्रस्तुत अपिल दाखल केलेले असून, अपेलंट यांचे अर्जानुसार प्रकरण मोजणीसाठी पाठविणेत आले होते. परंतु पुर्वी मोजणी झाली असल्याने प्रस्तुत प्रकरणात तालुका निरीक्षक भुमि अभिलेख यांचे ऐवजी उप-अधिक्षक भुमि अभिलेख वाळवा यांनी निमताना मोजणी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय अपेलंट व रिस्पॉंडंट यांचेतील वाद कायमस्वरुपी संपणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येवून, नि.५ मधील आदेशात पुढील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. अपेलंट/प्रतिवादी यांचे सदरचे मागणीमुळे गट नं.९५३, सर्व्हे ३८५/१० या जमीनीची मोजणी कोर्ट कमिशनर / तथा उप-अधिक्षक, भुमि अभिलेख, वाळवा (निमताना) यांचेमार्फत करावी. त्यासाठी येणारा खर्च अपेलंट/प्रतिवादी यांनी भरावा.

JAYSHRI MOHANLAL PARDESHI
Digitally signed by JAYSHRI MOHANLAL PARDESHI
Date: 2022.09.12 17:43:18 +05'30'

दि. ०८/०९/२०२२ (जे.एम.परदेशी)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश.१ इस्लामपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | J. R. More, Steno, (Grade-I) |
| Court Name | : | Adhoc District Judge – 1 & Addl. Sessions Judge, Islampur. |
| Date | : | 08/09/2022. |
| Signed by P.O. on | : | 12/09/2022. |
| Uploaded on | : | 12/09/2022. |